Parshvanath Charitable Trust's
# A. P. SHAH INSTITUTE OF TECHNOLOGY
(Approved by AICTE New Delhi & Govt. off Maharashtra, Affiliated to University of Mumbai)
(Religious Jain Minority Institution)
Programs accreditated by NBA: Civil Engg., Computer Engg., Information Technology., Mechanical Engg., CSE (Artificial Intelligence & Machine Learning), CSE (Data Science). Email : exam@apsit.edu.in

**Date: - 17-10-2026**

## EXAM FORM SUBMISSION NOTICE FOR DROUGHT AFFECTED STUDENTS

### Subject: Submission of Documents by Students from Drought-Affected Talukas for Examination Fee Exemption – Winter 2026(SH-2026 Exam) (AY 2026–27)

All students are hereby informed that, as per the University of Mumbai circular (copy attached) regarding examination fee exemption for students from drought-affected talukas, eligible students belonging to **peasant/farming families residing in talukas declared drought-affected by the Government of Maharashtra** are required to submit the necessary supporting documents for verification of their eligibility.

Students are advised to refer to the **list of drought-affected talukas provided in the attached University circular** and verify whether their taluka is included.

Eligible students must submit self-attested copies of the following documents to the College Examination Section:

1. **Domicile Certificate** of the student.
2. **7/12 Extract (Satbara Utara)** showing the student's parent as the landowner.
3. **Farmer ID** of the student's parent/farmer.
4. **Aadhaar Card** of the student.
5. **Income Certificate/Form 16** of the student's father.

Students are instructed to ensure that all documents are valid, legible, and submitted together for verification.

**Important Instructions:**

- This facility is applicable only to students who fulfil the eligibility conditions specified in the University circular and the relevant Government instructions.
- Submission of documents does not automatically guarantee exemption from examination fees. The claim will be considered after verification of eligibility and supporting documents.
- Students who meet the above criteria should contact the **College Examination Section** and submit the required documents on or before Wednesday, 21-10-2026 to exam section staff Mr. R. N. Patil/Miss Ashwini Tukrul.
- The attached University circular must be referred to for details regarding the applicable conditions and the list of eligible talukas.

All eligible students are advised to take note of this notice and complete the document submission process accordingly on or before Wednesday, 21-10-2026. After due date any requested will not be entertained.

**Principal**

A.P. SHAH INSTITUTE OF TECHNO...
Survey No. 12, C... Hypercity Mall,
Kasarvadavli, G.B. Road, Thane (W)

# मुंबई विद्यापीठ

संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
छत्रपती शिवाजी महाराज भवन,
विद्यानगरी परिसर, सांताक्रूझ (पूर्व)
मुंबई - ४०००९८.
Email - dboee@exam.mu.ac.in

( नॅक तृतीय चक्र मूल्यांकनाद्वारे ३.६५ (सीजीपीए) सह अ++ श्रेणी )
( विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे श्रेणी १ विद्यापीठ दर्जा

NO. 20260OCTMTSS00072954 दिनांक : 16 ऑक्टोबर, २०२६

## परिपत्रक

विषय: शैक्षणिक वर्ष - २०२६ परीक्षेसाठी विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करणे व भरलेले शुल्क परत करण्याबाबत.

संदर्भ : १: मदत व पुनर्वसन विभाग, शासन निर्णय क्र. समिती २८/प्र.क्र.८२/मदत/२, दि. २५.०९.२०२६.
२. मदत व पुनर्वसन विभाग, शासन निर्णय क्र. समिती -२०२६ /प्र.क्र.८२/मदत-२ , दि. १४ .१०.२०२६.
३. शासन पत्र, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक क्र. संकीर्ण-२०२६/प्र.क्र. ४५५/ई-१८८७९१९/तांशि-४, दि. १४ ऑक्टोबर, २०२६.

मुंबई विद्यापिठाशी संलग्नित / संचालित, स्वायत्त महाविद्यालये / संस्था, यांचे प्राचार्य/संचालक, विद्यापीठ शैक्षणिक विभागांचे प्रमुख, मान्यताप्राप्त संस्था/केंद्रांचे संचालक, संचालक, दूरस्थ व ऑनलाइन शिक्षण केंद्र, संचालक, धर्मविर आनंद दिघे ठाणे उपपरिसर, संचालक, स्कूल ऑफ इंजिनियरिंग अँड अप्लाइड सायन्सेस, कल्याण उपपरिसर, संचालक, चरित्रकार पद्मभूषण डॉ. धनंजय कीर रत्नागिरी उपपरिसर, संचालक, सिंधुदुर्ग उपपरिसर, प्राचार्य, विश्वभूषण भारतरत्न डॉ. बी. आर. आंबेडकर महाविद्यालय, आंबडवे, रत्नागिरी तसेच प्राचार्य, व्ही. व्ही. दळवी महाविद्यालय, तळेरे, सिंधुदुर्ग यांना कळविण्यात येते की, दुष्काळ व्यवस्थापन संहिता, २०१६ नुसार राज्यातील दुष्काळी परिस्थितीचे मूल्यांकन करण्याबाबत संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक १ व २ अन्वये सविस्तर कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे. सन २०२६ च्या खरीप हंगामातील परिस्थितीच्या आधारे Trigger-1 (प्रथम कळ) लागू झालेल्या २६५ तालुक्यांना दुष्काळग्रस्त तालुके म्हणून घोषित करण्यात आले होते. आता, खरीप २०२६ हंगामातील परिस्थितीच्या आधारे राज्यातील ३०५ तालुक्यांमध्ये Trigger-1 (प्रथम कळ) व Trigger-2 (दुसरी कळ) लागू झाल्याचे नमूद करण्यात आले आहे.

संदर्भ क्रमांक १ व २ नुसार अवर्षणग्रस्त भागातील ३०५ तालुक्यांमधील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफीचा लाभ देण्याचे धोरण ठरवण्यात आलें आहे . (सोबत अवर्षणग्रस्त भागातील ३०५ तालुक्यांची यादी जोडलेली आहे )

संदर्भीय क्रमांक ३, शासन पत्र, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, नुसार, सन २०२६ च्या खरीप हंगामातील Tiger-१ (प्रथम कळ) लागू झालेल्या ३८ जिल्ह्यांतील २६५ व Trigger-2 (दुसरी कळ) यातील ३०५ तालुक्यांतील रहिवासी असलेल्या महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याच्या सवलतीचा समावेश आहे. तथापी महाराष्ट्र शासनाच्या संदर्भाधीन शासन निर्णयानुसार मुंबई विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांतील अधिसूचित अवर्षणग्रस्त तालुक्यांचा (यादी सोबत जोडलेली आहे) समावेश परीक्षा शुल्क माफीच्या सवलतीमध्ये करण्यात आलेला आहे.

उपरोक्त शासन निर्णय व पत्रानुसार महाविद्यालयांनी करावयाची कार्यपद्धती खालीली प्रमाणे :

**१) ज्या विद्यार्थांनी शैषणिक वर्ष - २०२६ परीक्षेसाठी अर्ज भरून शुल्क अदा केलेले आहे त्यासंदर्भात महाविद्यालयांनी करावयाची कार्यपद्धती**

मुंबई विद्यापीठाशी संलग्न तसेच स्वायत्त महाविद्यालयांच्या प्राचार्यांना याद्वारे निर्देश देण्यात येतात की, सर्व विद्याशाखांतील दुष्काळग्रस्त तालुक्यांमधील पात्र विद्यार्थ्यांकडून हिवाळी २०२६ परीक्षेसाठी परीक्षा शुल्कापोटी जमा केलेली संपूर्ण रक्कम आजच दिनांक १६ ऑक्टोबर २०२६ पासून तात्काळ विद्यार्थ्यांना परत करण्याची कार्यवाही सुरू करावी. सदर कार्यवाही पुढील दोन दिवसांत पूर्ण करून पात्र विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफीचा लाभ मिळेल, याची संबंधित महाविद्यालयांनी दक्षता घ्यावी.

२) महाविद्यालयांनी परीक्षा शुल्क ऑनलाईन प्रणालीद्वारे विद्यापीठाकडे जमा केले असल्यास.

महाविद्यालयांनी विद्यापीठाकडे भरलेली परीक्षा शुल्काची रक्कम शासनाच्या निर्देशानुसार महाविद्यालयांच्या खात्यात परत करण्यात येईल.

३) अद्याप परीक्षा आवेदनपत्रे न भरलेले विद्यार्थी:

ज्या परीक्षांसाठी परीक्षा शुल्क अद्याप भरलेले नाही, अशा परीक्षांसाठी दुष्काळग्रस्त तालुक्यांतील पात्र विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क आकारण्यात येऊ नये. महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरताना पोर्टलवर उपलब्ध असलेल्या सुविधेनुसार "Drought Affected Taluka" DAT - MA 1, DAT MA 2, DAT-MA3, DAT – MB, DAT-OMB, DATOMU आणि Lateral Entry साठी DAT – LT 1MA1, LT 1MA2,LT1 MA3 अशी (दुष्काळग्रस्त तालुका) ही श्रेणी निवडावी. सदर श्रेणी निवडल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क अनिवार्य शुल्काच्या (Mandatory Fees) गणनेत समाविष्ट होत नसल्याची पोर्टलवरील नोंदीद्वारे खात्री करावी. तसेच, पात्र विद्यार्थ्यांसाठी योग्य श्रेणी निवडली जाईल आणि त्यांच्याकडून परीक्षा शुल्काची वसुली होणार नाही, याची महाविद्यालयांनी आवश्यक ती दक्षता घ्यावी.

४ ) मुंबई विद्यापीठाच्या कार्यक्षेत्राबाहेरील विद्यार्थ्यांसाठी :

तसेच, मुंबई विद्यापीठाच्या कार्यक्षेत्राबाहेरील जिल्ह्यांतील विद्यार्थी विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयांमध्ये किंवा विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांमध्ये शिक्षण घेत असल्यास, त्यांच्या रहिवासी दाखल्यांची पडताळणी करून ते शासन निर्णयानुसार अधिसूचित अवर्षणग्रस्त तालुक्यांचे रहिवासी असल्याची खात्री करावी. अशा पात्र विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क जमा करण्यात आले असल्यास, सदर शुल्क त्यांना परत करण्याची कार्यवाही करावी. तसेच, यापुढे कोणत्याही पात्र विद्यार्थ्याकडून परीक्षा शुल्क आकारण्यात येऊ नये. याबाबत सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांनी काटेकोरपणे कार्यवाही करावी.

दुष्काळग्रस्त परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांवर व त्यांच्या कुटुंबीयांवर पडणारा आर्थिक भार कमी करण्याच्या दृष्टीने, सर्व स्वायत्त व संलग्न महाविद्यालयांनी या परिपत्रकाची तात्काळ व काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. तसेच, कोणत्याही पात्र विद्यार्थ्याकडून परीक्षा शुल्क अथवा अतिरिक्त शुल्क आकारण्यात येऊ नये. यासंदर्भात दिलेल्या सूचनांचे पालन न केल्यास संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांविरुद्ध नियमानुसार कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

**(डॉ. पुजा रौंदळे)**
**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**प्रत :**

सर्व प्राचार्य/संचालक, संलग्नित/स्वायत्त महाविद्यालये/संस्था, विद्यापीठ शैक्षणिक विभागांचे प्रमुख, मान्यताप्राप्त संस्था/केंद्रांचे संचालक, संचालक, दूरस्थ व ऑनलाइन शिक्षण केंद्र, संचालक, धर्मविर आनंद दिघे ठाणे उपकेंद्र, समन्वयक, School of Engineering and Applied Sciences, कल्याण उपकेंद्र, संचालक, चित्रकार पद्मभूषण डॉ. धनंजय कीर रत्नागिरी उपकेंद्र, संचालक, सिंधुदुर्ग उपकेंद्र, प्राचार्य, विश्वभूषण भारतरत्न डॉ. बी. आर. आंबेडकर महाविद्यालय, आंबडवे, रत्नागिरी तसेच प्राचार्य, व्ही. व्ही. दळवी महाविद्यालय, तळेरे, सिंधुदुर्ग

**प्रत माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी :**
सर्व उपकुलसचिव, (परीक्षा व मूल्यमापन मंडळ) मुंबई विद्यापीठ.
संचालक, ( **DICT**) - सदर परिपत्रक विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याबाबत.
उपकुलसचिव, (जनसंपर्क विभाग ), मुंबई विद्यापीठ,
स्वीय सहाय्यक 1) मा. कुलगुरू 2) प्र-कुलगुरू 3) कुलसचिव

# परिशिष्ट-१

## खरीप हंगाम २०२६ - प्रथम कळ (Trigger-१) व दुसरी कळ (Trigger-२) लागू झालेल्या ३०५ तालुक्यांची यादी

| महसूल विभाग | अ.क्र. | जिल्हा | प्रथम कळ (Trigger-१) व दुसरी कळ (Trigger-२) लागू झालेले तालुके | तालुक्यांची संख्या |
|---|---|---|---|---|
| कोकण | १ | ठाणे | निरंक | ० |
| | २ | पालघर | जव्हार, मोखाडा, तलासरी | ३ |
| | ३ | रायगड | श्रीवर्धन | १ |
| | ४ | रत्नागिरी | रत्नागिरी, संगमेश्वर, राजापूर, लांजा, मंडणगड, खेड | ६ |
| | ५ | सिंधुदुर्ग | सावंतवाडी, दोडामार्ग, कणकवली, कुडाळ, वैभववाडी, मालवण, देवगड, वेंगुर्ला | ८ |
| नाशिक | ६ | नाशिक | मालेगाव, बागलाण, कळवण, नांदगाव, सुरगणा, इगतपुरी, पेठ, सिन्नर, येवला, देवळा, त्र्यंबकेश्वर, चांदवड व निफाड | १३ |
| | ७ | धुळे | धुळे, साक्री, सिंदखेडा, शिरपूर | ४ |
| | ८ | जळगांव | एरंडोल, पारोळा, धरणगाव, चोपडा, पाचोरा, जामनेर, जळगाव, भडगाव, अमळनेर, रावेर, चाळीसगाव, भुसावळ, बोदवड, मुक्ताईनगर, यावल | १५ |
| | ९ | नंदुरबार | अक्कलकुवा, शहादा, नंदूरबार, नवापुर, तळोदा, अक्राणी | ६ |
| | १० | अहिल्यानगर | अहिल्यानगर, पारनेर, श्रीगोंदा, कर्जत, जामखेड, शेवगाव, पाथर्डी, नेवासा, राहुरी, संगमनेर, अकोले, कोपरगाव, श्रीरामपुर, रहाता | १४ |
| पुणे | ११ | पुणे | भोर, वेल्हे, खेड, शिरूर, बारामती, इंदापूर, दौंड, पुरंदर, आंबेगाव, जुन्नर | १० |
| | १२ | सोलापूर | उ. सोलापूर, द. सोलापूर, बार्शी, अक्कलकोट, मोहोळ, माढा, करमाळा, पंढरपूर, सांगोला, माळशिरस, मंगळवेढा | ११ |
| | १३ | सांगली | मिरज, आटपाडी, जत, कवठेमहाकाळ, शिराळा, वाळवा, खानापूर, विटा, तासगाव, कडेगाव, पलुस | ११ |
| | १४ | सातारा | सातारा, खटाव, माण, फलटण, खंडाळा, महाबळेश्वर, पाटण, जावळी, वाई, कोरेगाव, कराड | ११ |
| | १५ | कोल्हापूर | पन्हाळा, राधानगरी, गगनबावडा, भुदरगड, आजरा, चंदगड, शाहूवाडी, शिरोळ | ८ |
| छ. संभाजीनगर | १६ | छ. संभाजीनगर | छ. संभाजीनगर, कन्नड, सोयगाव, पैठण, वैजापूर, गंगापूर, खुलताबाद, सिल्लोड, फुलंब्री | ९ |
| | १७ | जालना | बदनापूर, घनसावंगी, अंबड, जालना, परतूर, मंठा, भोकरदन, जाफ्राबाद | ८ |
| | १८ | बीड | बीड, गेवराई, माजलगाव, केज, आंबेजोगाई, परळी, आष्टी, पाटोदा, शिरूर कासार, धारूर, वडवणी | ११ |
| | १९ | लातूर | लातूर, औसा, अहमदपूर, निलंगा, उदगीर, चाकूर, रेणापूर, शिरुरअनंतपाळ, देवणी, जळकोट | १० |
| | २० | धाराशिव | धाराशिव, कळंब, भूम, वाशी, तुळजापूर, लोहारा, परांडा, उमरगा | ८ |
| | २१ | नांदेड | नांदेड, बिलोली, कंधार, लोहा, हदगाव, भोकर, देगलुर, किनवट, हिमायतनगर, माहूर, धर्माबाद, उमरी, अर्धापुर, नायगाव, मुदखेडा, मुखेड | १६ |
| | २२ | परभणी | पूर्णा, पालम, परभणी, सोनपेठ, जिंतूर, गंगाखेड, सेलू, मानवत, पाथरी | ९ |
| | २३ | हिंगोली | हिंगोली, औंढा नागनाथ, कळमनुरी, सेनगाव, वसमत | ५ |

| महसूल विभाग | अ.क्र. | जिल्हा | प्रथम कळ (Trigger-१) व दुसरी कळ (Trigger-२) लागू झालेले तालुके | तालुक्यांची संख्या |
|---|---|---|---|---|
| अमरावती | २४ | बुलढाणा | जळगावजामोद, संग्रामपुर, चिखली, देऊळगावराजा, मेहकर, बुलडाणा, शिंदेखेडराजा, लोणार, खामगाव, शेगाव, मलकापुर, मोताळा, नांदुरा | १३ |
| | २५ | अमरावती | अमरावती, भातुकली, चांदूर रेल्वे, नांदगाव खंडेश्वर, धामणगाव रेल्वे, अचलपूर, अंजनगावसुर्जी, तिवसा, धारणी, चिखलदरा, वरुड, मोर्शी, चांदुरबाजार, दर्यापुर | १४ |
| | २६ | अकोला | अकोट, अकोला, पातूर, तेल्हारा, मुर्तीजापूर, बाळापूर, बार्शीटाकळी | ७ |
| | २७ | वाशिम | वाशीम, रिसोड, मालेगाव, मंगळूरपीर, कारंजा, मानोरा | ६ |
| | २८ | यवतमाळ | यवतमाळ, बाभुळगाव, कळंब, दारव्हा, दिग्रस, आर्णी, नेर, पुसद, उमरखेड, महागाव, वणी, मारेगाव, झरी जामणी, केळापुर, घाटंजी, राळेगाव | १६ |
| नागपूर | २९ | वर्धा | वर्धा, सेलू, देवळी, आर्वी, समुद्रपूर, हिंगणघाट, आष्टी, कारंजा | ८ |
| | ३० | नागपूर | नागपूर, कामठी, सावनेर, पारशिवनी, मौदा, भिवापूर, कळमेश्वर, काटोल, रामटेक, हिंगणा, उमरेड, कुही, नरखेड, नागपूर शहर | १४ |
| | ३१ | भंडारा | भंडारा, पवनी, लाखंदूर, मोहाडी व तुमसर | ५ |
| | ३२ | गोंदिया | तिरोडा, आमगांव, देवरी, सालेकसा व गोंदिया, अर्जुनी मोरगाव, सडक अर्जुनी, गोरेगाव | ८ |
| | ३३ | चंद्रपूर | चंद्रपूर, भद्रावती, गोंडपिंपरी, राजूरा, कोरपना, मूल, वरोरा, सावली, चिमूर, नागभिड, सिंदेवाही, पोंभुर्णा, जिवती, ब्रम्हपूरी, व बल्लारपूर | १५ |
| | ३४ | गडचिरोली | गडचिरोली, चार्मोर्शी | २ |
| | | **एकूण** | **महाराष्ट्र राज्य (३४ जिल्हे)** | **३०५** |